राज्यात १४७ कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये क्षमतेच्या ८० टक्क्यांहून अधिक प्रवेश

मराठी, इंग्रजीसह उर्दू माध्यमाच्या कनिष्ठ महाविद्यालयांची संख्या लक्षणीय

पुणे– माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने अकरावीच्या ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेतील पहिल्या फेरीची निवड यादी नुकतीच जाहीर केली. त्यासह राज्यभरात ८० टक्क्यांहून अधिक प्रवेश जाहीर झालेल्या १४७ कनिष्ठ महाविद्यालयांची यादीही जाहीर करण्यात आली असून त्यात मराठी, इंग्रजीसह उर्दू माध्यमाच्या कनिष्ठ महाविद्यालयांची संख्या लक्षणीय असल्याचे दिसून येत आहे.

यंदा अकरावीची प्रवेशप्रक्रिया पहिल्यांदाच राज्यभर ऑनलाइन पद्धतीने राबवण्यात येत आहे. तांत्रिक अडचणींमुळे पहिली निवड यादी जाहीर करण्यास विलंब झाला. मात्र, मागील आठवड्यात निवड यादी जाहीर करण्यात आली. त्यानुसार ६ लाख ३२ हजार १९४ विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी मिळाली असून ४ लाख ५७ हजार ८४१ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे महाविद्यालय मिळाले आहे.प्रवेश जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयात जाऊन प्रवेश निश्चित करण्यासाठी ७ जुलैपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. या यादीसह क्षमतेच्या ८० टक्क्यांहून अधिक प्रवेश जाहीर केलेल्या १४७ कनिष्ठ महाविद्यालयांची यादी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने तयार केली आहे. या यादीत मुंबई, पुणे, लातूर, अकोला, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, रायगड, नंदूरबार, जळगाव, नाशिक, कोल्हापूर, बीड, सांगली, यवतमाळ अशा ठिकाणच्या महाविद्यालयांचा समावेश आहे. त्यात प्रामुख्याने मराठी, इंग्रजी माध्यमाच्या कनिष्ठ महाविद्यालयांचा समावेश आहे.

गजनी सरकार, विसरभोळा कारभार

विधानभवनात रोहित पवारांची पोस्टरबाजी

मुंबई– राज्य विधीमंडळाच्या अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विरोधक पुन्हा एकदा आक्रमक झाले आहेत. गजनी सरकार, विसरभोळा कारभार असे पोस्टर हातात घेऊन आ. रोहित पवार विधान भवनात पोहोचले. शेतकरी कर्जमाफीचा सरकारला विसर पडल्याचा रोहित पवार यांनी म्हटले आहे.

प्रसारमाध्यांसोबत बोलाताना आ. पवार म्हणाले की, आज विधिमंडळात कृषी दिन साजरा केला जाणार आहे. पण हे जे गजनी सरकार आहे, विसरभोळा कारभार अशी यांची परिस्थिती आहे. सरकारमध्ये असणाऱ्या सर्व नेत्यांनी जाहीर केले होते की आम्ही ७-१२ कोरा करू, पण ती फक्त घोषणाच राहिली, त्यावर काहीही झाले नाही. तसेच सन्मान निधी ३ हजार वाढ करू, शेतीला दिवसा वीज देऊ, मनरेगा निधी रोखला, शेतकऱ्यांची कर्जमाफी, पीक विमा, कशी मदत करणार आहे याबद्दल सरकारने सांगितले नाही, या सगळ्याचा सरकारला विसर पडला आहे, असा आ. पवार यांनी पोस्टरद्वारे टोला लगावला आहे.

शेतकऱ्याला, त्यांच्या लेकरांना, माता-भगिनींना सरकार विसरले आहे. गजनीप्रमाणे विसरभोळा सरकारचा कारभार चालू आहे. सरकारला फक्त राजकारण करायचे आहे. कृषिदिनानिमित्त शेतकऱ्यांना कर्जमाफीवर इतर योजना जाहीर कराव्या, योग्य वेळ म्हणजे निवडणुका आल्यावर, तोच योग्य वेळ आहे का? हे तरी सरकारने सांगावं, असेही आ. पवार यांनी म्हटले आहे.

जूनमध्ये १ लाख ८५ हजार जीएसटी संकलन

मागील वर्षीच्या तुलनेत ६.२ टक्क्यांची वाढ

नवी दिल्ली– चालू वर्षी जूनमध्ये देशाच्या वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) संग्रह १.८५ लाख कोटी रुपये होता, जो गेल्या वर्षीच्या जूनपेक्षा ६.२ टक्के जास्त आहे. सरकारने मंगळवारी हे आकडे जाहीर केले आहेत. जूनमधील संग्रह मे महिन्यापेक्षा किंचित कमी होता, कारण एप्रिल २०२५ मध्ये २.३७ लाख कोटी रुपये आणि मे महिन्यात २.०१ लाख कोटी रुपयांचा विक्रमी संग्रह झाला होता.

जीएसटीने अंमलबजावणीची आठ वर्षे पूर्ण केली आहेत. या काळात संकलनात प्रचंड वाढ झाली आहे. सरकारच्या मते, गेल्या पाच वर्षांत जीएसटी संकलन दुप्पट झाले आहे. आर्थिक वर्ष २०२५ मध्ये एकूण २२.०८ लाख कोटी रुपये जमा झाले, जे आर्थिक वर्ष २०२१ मधील ११.३७ लाख कोटी रुपयांपेक्षा खूपच जास्त आहे. या आकडेवारीवरून असे दिसून येते की जीएसटी प्रणाली आता देशाच्या अर्थव्यवस्थेचा एक मजबूत आधारस्तंभ बनली आहे.

जीएसटी संकलनातील ही वाढ अर्थतज्ज्ञ आणि व्यावसायिक सकारात्मक संकेत मानत आहेत. यामुळे सरकारला पायाभूत सुविधा, आरोग्यसेवा आणि इतर योजनांसाठी अधिक निधी मिळेल. तसेच, व्यावसायिकांचा कर प्रणालीशी समन्वयही सुधारला आहे, ज्यामुळे करचोरी कमी झाली आहे. सरकारचे म्हणणे आहे की जीएसटीमुळे केवळ कर प्रणाली सोपी झाली नाही तर देशाची अर्थव्यवस्था अधिक पारदर्शक झाली आहे.

वार्षिक संकलनात ९.४ टक्के वाढ

२०२५ च्या आर्थिक वर्षात जीएसटी संकलनाने एक नवीन विक्रम प्रस्थापित केला. या वर्षी एकूण २२.०८ लाख कोटी रुपये गोळा झाले आहेत. जे गेल्या आर्थिक वर्ष २०२४ च्या २०.१८ लाख कोटी रुपयांपेक्षा ९.४ टक्के जास्त आहे. जुलै २०१७ मध्ये जीएसटी लागू झाल्यापासून नोंदवलेला हा आतापर्यंतचा सर्वाधिक वार्षिक जीएसटी संकलन आहे. या वाढीवरून हे स्पष्ट होते की सरकारची कर व्यवस्था मजबूत झाली आहे आणि व्यावसायिक क्रियाकलापांनाही गती मिळत आहे.

आषाढीला एसटी कर्मचाऱ्यांना मोफत भोजन

परिवहनमंत्री सरनाईक यांची घोषणा

मुंबई– भूवैकुंठ असलेल्या पंढरपुरात आषाढी एकादशीच्या दिवशी लाखो वारकरी येतात. वारकऱ्यांना पंढरपूरपर्यंत पोहोचण्यासाठी एसटी महामंडळाकडून अधिक बस चालवल्या जाणार आहेत. त्याचबरोबर आषाढी एकादशी निमित्ताने राज्याच्या वेगवेगळ्या भागातून पंढरपूरला बसेस घेऊन येणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी मोफत भोजनाची व्यवस्था असणार आहे. राज्याचे परिवहन आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी याबद्दलची माहिती दिली.

आषाढी एकादशी निमित्त पंढरपूर येथे विठुरायाच्या दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांच्या सेवेसाठी एसटीच्या ५,२०० बसेसची व्यवस्था केली आहे. या बसेस घेऊन येणारे चालक, वाहक त्यांची देखभाल करणारे यांत्रिक कर्मचारी, पर्यवेक्षक, अधिकारी यांच्या चहा, नाश्ता व जेवणाची व्यवस्था मोफत करण्यात आली आहे, असे प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

शालार्थ घोटाळ्याची एसआयटीमार्फत चौकशी

मुंबई (प्रतिनिधी)– नागपूर जिल्ह्यातील बनावट शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या शालार्थ घोटाळ्याचे पडसाद मंगळवारी विधानसभेत उमटले.

हे प्रकरणे केवळ नागपूर जिल्ह्यात मर्यादित नसून राज्यातील इतर जिल्ह्यातही फोफावली असल्याची शंका आमदारांनी सभागृहात व्यक्त केली. अखेर याप्रकरणी राज्यव्यापी एसआयटी स्थापन करण्याची घोषणा शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी विधानसभेत केली. या एसआयटीत वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांसह सनदी अधिकाऱ्यांचाही समावेश करण्यात येईल. येत्या तीन ते चार महिन्यात एसआयटीला चौकशी अहवाल देण्याची सूचना करण्यात येईल. त्यानंतर दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असेही भुसे यांनी सांगितले.

जागतिक रक्तदान दिनानिमित्त आयोजित शिबिरात ६३ दात्यांचे रक्तदान

श्रीरामपूर (प्रतिनिधी)– १ जुलै जागतिक रक्तदान दिनानिमित्त रोटरी क्लब, इनरव्हिल क्लब, इंडियन मेडिकल असोसिएशन, इंडियन डेंटल असोसिएशन, सीए असोसिएशन, श्रीरामपूर पत्रकार संघ, श्रीरामपूर सायकलिंग क्लब, श्रीरामपूर आर्किटेक्ट ॲन्ड इंजिनीअर्स असोसिएशन, ओरिएंटल इन्शुरन्स आणि नित्यसेवा ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिरात ६३ रक्तदात्यांनी रक्तदान केले असल्याची माहिती रोटरी क्लबचे अध्यक्ष उद्धव तांबोळी यांनी दिली.

रक्तदान शिबिराचे उद्घाटन उप-प्रादेशिक वाहन अधिकारी अनंता जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संदीप शहा, रोटरी क्लबचे अध्यक्ष अजित घोगरे, सचिव सरबजीतसिंग चुग, इनरव्हिल क्लब अध्यक्ष डॉ. शितल भुतडा, सेक्रेटरी नम्रता मुंदडा, श्रीरामपूर पत्रकार संघाचे अध्यक्ष अशोक गाडेकर, सचिव प्रकाश कुलथे, आय.एम.ए. अध्यक्ष डॉ. अतुल करवा, डॉ. संकल्प शिरसाठ, एस.टी.एम.ए. महाराष्ट्र अध्यक्ष डॉ. दिलीप शेजवळ, सेक्रेटरी डॉ. तौफिक शेख, सायकलिंग असोसिएशन अध्यक्ष संकेत मुंदडा, सागर जावळे, डॉ. सशांत सातदिवे, डॉ. धिरज उंबरे, संदिप चव्हाण, संजय देशमुख, विनोद पाटणी, डॉ. दिलीप पडघन, डॉ. रविंद्र जगधने, उल्हास धुमाळ, अनिल पांडे, राजेंद्र बोरसे, गणेश देशपांडे, भाग्येश कोठावळे, रवी निकम, ब्रिजेश शहा, प्रवीण घोगरे, सचिन दळवी, डॉ. मयूर कापसे, डॉ. प्रशांत कदम आदींसह रोटरी क्लब, इनरव्हिल क्लब, इंडियन मेडिकल असोसिएशन, इंडियन डेंटल असोसिएशन, सीए असोसिएशन, सायकलिंग क्लब, आर्किटेक ॲन्ड इंजिनीअर्स असोसिएशन, ओरिएंटल इन्शुरन्स कं. लि. चे सदस्य उपस्थित होते. नित्यसेवा ब्लड बँकचे डॉ. ओम जोंधळे यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांनी काम पाहिले.

वाजत-गाजत गुलाल उधळत या; उद्धव-राज यांचे मेळाव्यासाठी संयुक्त निमंत्रण

मुंबई (प्रतिनिधी)– राज्य शिक्षण मंडळाच्या शालेय अभ्यासक्रमातइयत्तापहिलीपासून हिंदी विषयाची सक्ती रद्द करण्यात आल्यानंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा संयुक्त मेळावा ५ जुलै रोजी पार पडणार आहे. वरळीच्या राष्ट्रीय क्रीडा संकुलात (एनएससीआय डोम) सकाळी १० वाजता हा मेळावा पार पडणार असून वाजत गाजत गुलाल उधळत या मेळाव्याला या, असे संयुक्त निमंत्रण राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्याकडून मराठी माणसाला देण्यात आले आहे.

हिंदी सक्तीविरोधातील मोर्चा रद्द झाल्यानंतर या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्याच्या निमित्ताने तब्बल १८ वर्षांनी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे एका व्यासपीठावर दिसणार आहेत. पहिल्यांदाच दोन्ही पक्षांनी संयुक्त निवेदनाद्वारे मराठी जनतेला या मेळाव्यासाठी निमंत्रित केले असून निमंत्रणाखाली दोघांचेही नाव आहे. जल्लोष करण्यासाठी, वाजत गाजत, जल्लोषात, गुलाल उधळत या, आम्ही वाट बघतोय असे संयुक्त आवाहन करण्यात आले आहे. दोन्ही पक्षाच्या नेत्यांकडून हे निमंत्रण एक्स या समाज माध्यमात प्रसिद्ध मंगळवारी करण्यात आले. मेळाव्याच्या तयारीसाठी शिवसेना ठाकरे गट आणि मनसे पदाधिकाऱ्यांच्या संयुक्त बैठकाही होत आहेत. ठाकरेंच्या शिवसेनेकडून संजय राऊत, अनिल परब, वरूण सरदेसाई तर मनसेकडून बाळा नांदगावकर, अभिजीत पानसे, संदीप देशपांडे, नितीन सरदेसाई यांच्याकडे नियोजनाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

पंचनाम्यानंतर अवकाळी पावसाची नुकसान भरपाई

मुंबई (प्रतिनिधी)– राज्यात मार्च ते मे २०२५ या दरम्यान झालेल्या अवकाळी पावसामुळे एकूण ७५ हजार ३५५ हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून १ लाख ६८ हजार ७५० शेतकरी प्रभावित झाले आहेत. यासाठी सुमारे २१३ कोटी रुपयांची नुकसान भरपाई अपेक्षित आहे. यासंदर्भात पंचनामे पूर्ण होताच राज्य सरकारच्या प्रचलित धोरणानुसार शेतकऱ्यांना मदतीचे वाटप करण्यात येईल, अशी माहिती मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी मंगळवारी विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. राज्यात नैसर्गिक आपत्तीमुळे मृत्युमुखी पडलेल्या कुटुंबियांना आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई देण्याबाबत काँग्रेसचे आमदार राजेश राठोड यांनी प्रश्न विचारला होता.

पान १ वरुन

भंडारदरा, दारणा पाणलोटात...

सरी कोसळू लागल्या आहे. यामुळे उंचावरुन वाहून येणारे पाणी वेगाने धरणाच्या पोटात विसावत असल्यामुळे धरणाचे पोट विस्तारत आहे. गेल्या २४ तासांत (मंगळवारी सकाळी ६ वाजेपर्यंत) भंडारदरा धरणात ३५९ दलघफू नवीन पाणी जमा झाले. तर निळवंडेत १७९ दलघफू नवीन पाणी दाखल झाले. तसेच वाकी तलाव पूर्ण क्षमतेने भरलेला असल्याने कृष्णावंती नदी वाहती आहे. दरम्यान, स्वातंत्र्य दिनी भंडारदरा धरण भरण्याचा प्रघात आहे. यावर्षी जुलै महिन्यातच दोन्ही धरणे ओव्हर फ्लो होण्याची शक्यता आहे.

जायकवाडी जलाशयात ६० टीएमसी

आवक झाली. दारणा धरण ५२.०४ टक्क्यांवर स्थिर आहे. नवीन येणारे पाणी विसर्गाच्या स्वरूपात बाहेर टाकले जात आहे. दारणा धरणात १ जूनपासून सुमारे ५ टीएमसी पाण्याची आवक झाली, तर ३.७ टीएमसी पाण्याचा विसर्ग करण्यात आला आहे. शेजारील भावली ८९ टक्क्यांवर पोहचले आहे. १०० टक्के झाल्यावर त्यातून विसर्ग सुरू होईल.

गंगापूर धरणाच्या पाणलोटात काल हलक्या स्वरूपाच्या सरी कोसळत होत्या. या धरणाचा साठा ५७.३५ टक्के झाला आहे. गंगापूर धरणातून १३६० क्यूसेकने विसर्ग सुरू आहे. या धरणातून २.३ क्यूसेकने विसर्ग सुरू होता. नांदुर-मधमेश्वर बंधाऱ्यातून काल दुपारी ३ वाजता गोदावरीतील विसर्ग रात्रभर बंद करण्यात आला आहे. आज सकाळी बंधाऱ्याची लेव्हल आल्यानंतर पुन्हा सुरू होईल. पाणीसाठी बंधाऱ्याचे गेट पूर्णतः वर करण्यात आले होते. काल सकाळपर्यंत या बंधाऱ्यातून जायकवाडीच्या दिशेने गोदावरीत १३ टीएमसी पाण्याचा विसर्ग करण्यात आला. जायकवाडीत काल सायंकाळच्या आकडेवारीनुसार मृतसह एकूण साठा ६०.३० टक्के इतका साठा आहे, तर उपयुक्त साठा ३४.३० टक्क्यांवर पोहचला आहे. उपयुक्त साठा ४४.६४ टक्के इतका झाला आहे.

माझी वाटचाल शरद पवारांसोबतच

व इतर संस्थातील काम बघून मोठा विश्वास टाकून २१-० तोही मोठ्या फरकाने विजय मिळवून देऊन विश्वास दाखवला. परंतु भाजप महायुती शासनाच्या एकंदर गेल्या दहा वर्षातील प्रवृत्तीनुसार त्यांचे सहकार्य फक्त शासनाबरोबर असणाऱ्या कारखान्यांनाच करण्याचे दिसत आहे. कारखाना सुरू करण्याचे आव्हान असल्याने त्यांनी आपल्या सहकाऱ्यांसह राष्ट्रवादी अजित पवार गटात प्रवेश केल्याचे दिसत आहे.

मात्र देशाचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे शेती व शेतकरी तसेच ग्रामीण भागातील प्रश्न याबाबत मोठे काम असून त्यांनाच ग्रामीण भागातील प्रश्नांची जाण आहे. त्याचप्रमाणे देशातील सर्वात मोठी कर्जमाफी असो किंवा हिंजवडी आयटी पार्क असो, शेतकऱ्यांसाठी विविध योजना असो, या सर्व कामांचे श्रेय शरद पवारांना जाते. पहिल्या प्रयत्नात आमदार होताना राज्यमंत्रीपदाच्या सहा खात्यांची जबाबदारी देऊन शरद पवार यांनी जो विश्वास दाखवला त्यातून राज्यात व मतदार संघात विजेच्या प्रश्नात मोठे काम करून पायाभूत सुविधा निर्माण करू शकलो. त्याचप्रमाणे निळवंडेच्या कालव्याचे पाणी आणण्यासाठी मोठा निधी मिळविण्यात व हे काम मार्गी लागण्यासाठी शरद पवार यांनी मोठे सहकार्य केले. त्यामुळे आपण शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसमध्येच असून कार्यकर्त्यांनी याबाबत कोणतीही शंका बाळगू नये, असे त्यांनी यावेळी सांगितले.

स्थानिक स्वराज्यसाठी कार्यकर्त्यांशी चर्चा

आगामी स्थानिक स्वराज्य संस्था व इतर निवडणुकीबाबत विचारले असता या निवडणुकात स्थानिक विचारांनी युती होत असतात. माझ्याविरुद्धही नगराध्यक्षपदासाठी व नगरपरिषदेसाठी काँग्रेस व भाजप एकत्रित राहुरीत लढले होते. त्यामुळे या निवडणुकीबाबत वेळ येईल तेव्हा कार्यकर्त्यांच्या विचारातून भूमिका घेतली जाईल, त्याबाबत शंका बाळगण्याचे कारण नाही.

रवींद्र चव्हाण भाजपचे नवे...

बिनविरोध निवड करण्यात आली. रवींद्र चव्हाण हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अत्यंत विश्वासू नेते म्हणून ओळखले जातात. तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारसरणीचे नेते अशीही त्यांची ओळख आहे. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना त्यांनी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री म्हणून काम केलं. तसेच देवेंद्र फडणवीस यांचे सरकार सत्तेत आल्यानंतर त्यांनी भाजपचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून काम पाहिलं. चंद्रशेखर बावनकुळे यांच्यानंतर ते भाजपचे १२ वे अध्यक्ष म्हणून काम पाहतील. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत जास्तीत जास्त लोकप्रतिनिधी निवडून आणणे आणि भाजपला एक नंबरचा पक्ष बनवणे हे त्यांच्यासमोरील आव्हान असेल. दरम्यान यावेळी रवींद्र चव्हाण हे भाजपचे नावाने बारावे अध्यक्ष असतील. मात्र, ते विरोधकांचे राजकीय तेरावे घालतील, विरोधकांचे बारा वाजवल्याशिवाय राहणार नाही असं मुंबईचे अध्यक्ष आशिष शेलार म्हणाले.

चव्हाण यांची वाटचाल

२००२ साली भारतीय जनता पक्ष युवा मोर्चाचे कल्याण उपजिल्हाध्यक्ष म्हणून जबाबदारी. २००५ मध्ये काँग्रेस उमेदवाराचा पराभव करत कल्याण-डोंबिवली महापालिकेत नगरसेवक. २००७ मध्ये महापालिका स्थायी समितीचे सभापती. २००९ पासून, डोंबिवली विधानसभा मतदारसंघाच्या निर्मितीपासून सलग चार वेळा आमदार. २०१६ साली फडणवीस सरकारमध्ये राज्यमंत्री म्हणून मंत्रिमंडळात स्थान. २०१६ ते २०१९ या काळात बंदरे, माहिती व तंत्रज्ञान, वैद्यकीय शिक्षण तसेच अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण या ४ खात्यांच्या राज्यमंत्री पदाची जबाबदारी. रायगड आणि पालघर या जिल्ह्यांच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी. २०२० साली भाजपा महाराष्ट्र प्रदेश महामंत्री म्हणून नेमणूक. २०२२ साली शिंदे-फडणवीस सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री. दोन खात्यांची जबाबदारी. सिंधुदुर्ग आणि पालघर या जिल्ह्यांच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी. अन्न, नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण मंत्री पदाच्या कारकिर्दीत आनंदाचा शिधा, रेशन आपल्या दारी सारखे महत्त्वाचे उपक्रम राबवले. कट्टर सावरकर भक्त, मॉरिशस महाराष्ट्र मंडळाला स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा पुतळा स्थापन करण्यास मोलाचे सहकार्य. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भारतीय जनता पार्टी यांच्या विचारधारेचे संस्कार. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे विश्वासू अशी ओळख.

विधानसभेच्या कामकाजावर...

विधानसभेच्या दिवसभराच्या कामकाजावरही बहिष्कार घातला. शेतकऱ्यांचा वारंवार अपमान सत्ताधारी करत आहेत, अशा सरकारचे प्रमुख म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांची माफी मागावी, अशी मागणी महाविकास आघाडीच्या आमदारांनी केली. शेतकऱ्यांच्या विषयावर काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार, नाना पटोले विधानसभा अध्यक्षांच्या स्थानाजवळ गेले. या गोंधळामुळे विधानसभेचे कामकाज पाच मिनिटांसाठी तहकूब करण्यात आले. कामकाज पुन्हा सुरू झाल्यावर मुख्यमंत्र्यांनी माफी मागावी अशी पुन्हा घोषणाबाजी सुरू झाली. त्यावेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी नाना पटोले यांच्यावर एक दिवसाच्या निलंबनाची कारवाई केली.

राज्यात मंगळवारी शक्तिपीठ महामार्गाविरोधात शेतकऱ्यांचे आंदोलन चालू आहे. बारा जिल्ह्यातील शेतकरी या महामार्गाला विरोध करत आहे, दुसरीकडे राज्याचे कृषिमंत्री शेतकऱ्यांविरोधात विधान करतात, सत्ताधारी आमदार बबनराव लोणीकर शेतकरी आमच्या पैशावर जगतात अशी उपकाराची भाषा करतात. लोणीकर यांच्यावर कारवाई होत नाही. यावरून अशी विधाने करणाऱ्यांचे सरकार समर्थन करत आहे का? असा सवाल काँग्रेस विधिमंडळाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.

वारीदरम्यान मृत्यू झाल्यास...

कुटुंबीयांना आर्थिक आधार मिळणार आहे. १६ जून ते १० जुलै या कालावधीत वारीदरम्यान जर एखाद्या वारकऱ्याचा अपघात, विषबाधा किंवा इतर नैसर्गिक कारणामुळे मृत्यू झाला, तर त्यांच्या कुटुंबीयांना ही रक्कम मिळणार आहे. मात्र आत्महत्येच्या घटनांमध्ये ही मदत लागू होणार नाही. याशिवाय, वारीदरम्यान अपघातामुळे अपंगत्व आल्यास देखील आर्थिक मदतीची तरतूद आहे. अपघाताने व दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या निकटच्या वारसदारांस ४ लाखांची मदत. वारीदरम्यान अपंगत्व आलेल्या वारकऱ्यांना ४० ते ६० टक्के अपंगत्व आल्यास ७४ हजार. ६० टक्क्यांवरून अधिक अपंगत्व आल्यास २.५० लाख आणि एका आठवड्यापेक्षा अधिक कालावधीसाठी इस्पीतळात दाखल झाल्यास १६ हजार रुपये तर एक आठवड्यापेक्षा कमी कालावधीसाठी दाखल असल्यास ५ हजार ४०० रुपयांची मदत सरकार करणार आहे. शासनाच्या नव्या परिपत्रकानुसार, विठ्ठलाच्या दर्शनासाठी येणाऱ्या वारकऱ्यांकरता वारी सुरू झाल्याच्या दिनांक पासून म्हणजेच १६ जून ते १० जुलैदरम्यान, अपघाताने अथवा दुर्घटनेत मृत्यू झालेल्या तसेच जखमी झालेल्या वारकऱ्यांसाठी मदतीची तरतूद करण्यात आली आहे . आत्महत्या विषबाधा खून वगळून इतर नैसर्गिक मृत्यू अपघाताने झालेल्या दुर्घटनांमध्ये ही आर्थिक मदत सरकारच्यावतीने देण्यात येणार आहे.

प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये ३ महिने...

लीड बँक (आग्रणीय बँक) यांच्यावतीने प्रयत्न सुरू सुरू करण्यात आले आहेत. यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायत पातळीवर आर्थिक संपृक्तता (पुर्तता) अभियान राबवण्यात येणार आहे. या अभियानाच्या उद्देशात वंचित घटकांना औपचारिक वित्तीय सेवांमध्ये समाविष्ट करणे आणि त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे आहे. अभियानाअंतर्गत बँकांना प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये ३० सप्टेंबरपर्यंत तीन महिने विशेष शिबिरे आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यात खातेधारकांच्या केवायसीची पुनर्पडताळणी, ज्यामध्ये विद्यमान निष्क्रिय पीएमजेडीवाय खात्यांचा समावेश आहे. तसेच पीएमजेडीवाय अंतर्गत बँक खाते नसलेल्या प्रौढांसाठी बँक खाती उघडणे. तसेच प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना (पीएमजेजेबीवाय) आणि प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना (पीएमएसबीवाय) अंतर्गत नोंदणी. अटल पेन्शन योजना (एपीवाय) अंतर्गत नोंदणी, तसेच डिजिटल फसवणूक प्रतिबंध आणि दावा न केलेल्या ठेवींमध्ये प्रवेश मिळविण्याचे मार्ग आणि तक्रार निवारण यावर जागरूकता सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. याबात विशेष जिल्हा सल्लागार समितीच्या बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. आशिय यांनी जिल्ह्यातील सर्व बँकर्सना प्रत्येक ग्रामपंचायतीत शिबिरे आयोजित करण्याचे निर्देश दिले. पीएमजेजेबीवाय आणि पीएमएसबीवायच्या अधिकाऱ्यांना या मोहिमेत सक्रियपणे सहभागी होवून सर्व बँकर्सना मदत करण्याचे आदेश दिले असल्याची माहिती लीड बँकेच्यावतीने देण्यात आली.

अशी आहे योजना

- मृत्यू झाल्यास २ लाख रुपये आणि अपंगत्व आल्यास १ लाख रुपयांचे संरक्षण आहे. या योजनेत वार्षिक नूतनीकरण, ऑटो-डेबिट सुविधा आहे.

झेडपी राबवणार गावागावात...

संकलन करून योग्य ठिकाणी साठवणूक करणे, साठवणूक केलेल्या प्लास्टिक कचर्याची नोंद ग्रामपंचायत व तालुकास्तरावर ठेवणे, जेणेकरून तालुकास्तरीय प्लास्टिक कचरा व्यवस्थापन प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर साठवणूक केलेला प्लास्टिक कचरा प्रक्रिया करण्याकरिता पाठवण्यात येणार आहे. हे काम विस्तार अधिकारी (पंचायत) यांना तालुकास्तरावर समन्वय अधिकारी म्हणून नेमण्यात आले आहे. या अभियानाचा कालावधी ३० जुलै असा राहणार आहे.अभियानात तालुक्यातील ग्रामपंचायत स्तरावर ब्लॅक स्पॉट (कचरा ठिकाणे) शोधून काढणे, ग्रामपंचायतीमधील दर्शनी भागातील प्लास्टिक कचरा संकलन करणे, आणि संकलित झालेला प्लास्टिक कचरा ग्रामपंचायत स्तरावर साठवणुकीसाठी विशेष व्यवस्था करण्यात येणार आहे. ग्रामपंचायत स्तरावर शासकीय व निमशासकीय कार्यालयांचे याबाबत सहाय्य घेण्यात येणार आहे. शालेय स्तरावरही विद्यार्थ्यांना प्लास्टिक कचराबाबत मार्गदर्शन करण्याच्या सूचना गटशिक्षण अधिकाऱ्यांनी शाळांना दिल्या आहेत.

ग्रामपंचायत अंतर्गत प्लास्टिक वापराबाबत जनजागृती, दंड आकारणी, आणि प्लास्टिक बंदी ठरावानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे. पर्यावरणपूरक व प्रदूषणमुक्त सण उत्सव साजरा करण्याबाबत ग्रामस्थांमध्ये जनजागृती व प्रचार-प्रसार करण्यात येणार आहे. शासनाने दिलेल्या निर्देशांनुसार या विशेष मोहिमेचा तालुक्यातील सर्व गावांमध्ये यशस्वीपणे कार्यान्वित करण्यासाठी गावातील महिला बचत गट, युवक मंडळ, शाळा, व ग्रामस्तरावरील सर्व अधिकारी, कर्मचारी, आणि ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग नोंदवावा व अभियान यशस्वी करावे, असे आवाहन जलजीवनचे प्रकल्प संचालक राजेंद्र देसले यांनी केले आहे.